**N.C.R.B (एन.सी.आर.बी)**

**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)**

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** कोल्हापुर **P.S.(ठाणे):** लक्ष्मीपूरी

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0391 **Year (वर्ष):** 2024

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**05/10/2024 23:46

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** दरमियानी दिन

**Time Period (कालावधी):**

**Date From (दिनांक पासून):** 04/10/2024

**Date To ( दिनांक पर्यंत):** 05/10/2024

**Time From (वेळेपासून):** 17:17 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 11:32 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 05/10/2024 **Time (वेळ):** 21:30 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 044

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 05/10/2024 22:12 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पश्चिम, 2 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** पदमाराजे शाळेच्या आवरात ,शुक्रवार पेठ ,कोल्हापूर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** सागर हरीदास मानकर

(b) **Guardian's Name (पालक चे नाव) :** हरीदास मानकर

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1975

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | शुक्रवार पेठ,खोलखंडोबा तालीम ,कोल्हापूर,लक्ष्मीपूरी,कोल्हापुर,महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | शुक्रवार पेठ,खोलखंडोबा तालीम ,कोल्हापूर,लक्ष्मीपूरी,कोल्हापुर,महाराष्ट्र, भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9022283718

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | सचिन सिताराम कांबळे | | वडील का नाम : सिताराम कांबळे | 1. 402,दुसरा मजला देवकर पानंद,कोल्हापूर,लक्ष्मीपूरी, कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | उमेश बाळकष्ण लिंगनुरकर | | वडील का नाम : बाळकष्ण लिंगनुरकर | 1. 2875,सी वर्ड समाज मंदिर जवळ,,सिध्दार्थ नगर, कोल्हापूर,लक्ष्मीपूरी,कोल्हापुर, महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 80000रुपये त्यामध्ये 500 रुपये दराच्या 60चलनी नोटा व 500 रुपये लिहिलेल्या लहान मुलांच्या खेळण्यातील | 80,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

80,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्यादि दिनांक - 05/10/2024

मी श्री.सागर हरीदास मानकर, वय-49 वर्षे ,व्यवसाय- टेलरींग उद्योग, रा.शुक्रवार पेठ,खोलखंडोबा तालीम श्ेाजारी,कोल्हापूर मो.नं.9022283718 समक्ष पोलीस ठाणेस हजर राहुन फिर्याद देतो की,

मी दिनांक 04/10/2024 रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो कोल्हापूर येथे पोलीस उप अधीक्षक वैष्णवी पाटील यांना समक्ष भेट्न माझेकडे होत असलेल्या लाच मागणीबाबत तक्रार सागितली की, माझा शुक्रवार पेठ, कोल्हापूर येथे श्री.केदारनाथ गारमेंन्ट नावाची फर्म असुन मी जिल्हा परिषद तसेच खाजगी शाळांचे शालेय गणवेश तयार करुन देण्याचे काम घेत असतो. महिला आर्थीक विकास महामंडळ, कोल्हापूर यांचेकडून करवीर तालूका येथील जिल्हा परिषद, कोल्हापूर यांचेकडील 19 केंद्र शाळांना गणवेश शिवुन पुरवठा करण्याचे काम माझे ओळखीच्या सौ.सोनाली प्रविण खोत अध्यक्षा, लक्ष्मी स्वयंसहाय्यता महिला समुह, पिरवाडी ता.करवीर जि. कोल्हापूर यांना मिळाले होते. त्यांचे महिला गटास काम मिळालेनंतर त्यांनी मला त्यांचे गटास मिळाले काम करणेस तसेच काम पुर्ण झालेनंतर महिला आर्थीक विकास महामंडळ, कोल्हापूर येथे जावुन केले कामाचे बिल मिळणेबाबतचे काम त्यांचे वतीने करणेस सांगुन कामाचे बिल मिळालेनंतर ते बचत गटाचे खात्यावर जमा झालेनंतर मला सोनाली खोत अध्यक्षा लक्ष्मी स्वयंसहाय्यता महिला समुह, पिरवाडी हया सदरचे कामाचे माझे बिल मला देणार होत्या असे आमचे ठरले होते. त्याप्रमाणे मी दिनांक 29/05/2024 रोजी मी काम सुरु करून शालेय गणवेश तयार करण्याचे काम दि.26/08/2024 रोजी पुर्ण करून लक्ष्मी स्वयंसहाय्यता महिला यांना दिले. सदर शालेय गणवेश तयार करण्याचे कामाचे एकुण बिल 18,35,814/- रुपये इतके झाले होते. लक्ष्मी स्वयंसहाय्यता महिला समुह पिरवाडी यांचेत व माझेत ठरलेप्रमाणे मी कामाचे बिलाबाबत महिला आर्थीक विकास महामंडळ, कोल्हापूर येथे पाठपुरावा करीत होतो. त्याप्रमाणे कामाचे एकुण बिलाचे रक्कमेपैकी 14,35,000/- रुपये बिल सौ.सोनाली प्रविण खोत अध्यक्षा, लक्ष्मी स्वयंसहाय्यता महिला समुह, पिरवाडी ता.करवीर जि.कोल्हापूर यांचे बॅक खात्यामध्ये वेळोवेळी जमा झालेले असुन सदर रक्कम मला त्यांचेकडून मिळालेली आहे. त्यानंतर मी मागील महिन्यात शिल्लक बिलाची रक्कम मंजुर झाली नसल्याने महिला आर्थीक विकास महामंडळ, कोल्हापूर येथील उमेश लिंगणुरकर यांची भेट घेवून विचारले असता त्यांनी मला तुमचे 14,35,000/- चे बिल मंजुर केलेले आहे. बिल मंजुर केले म्हणुन तसेच शिल्लक राहीलेले बिल मंजुर करावयाचे असेल तर तुम्हाला मला व सचिन कांबळे साहेब यांना मिळून 80000/- रुपये हे दयावे लागतील तरच शिल्लक राहीलेले बिल मंजुर होईल असे सांगितले. त्यावेळी मी त्यांना काहीतरी कमी जास्त करा असे म्हणालो त्यांनी पैसे कमी जास्त करणेस नकार दिला त्यावेळी मी त्यांना पैशाची जुळणा झालेनंतर भेटतो असे सांगितले. त्यानंतर ब-याचवेळा उमेश लिंगनुरकर हे माझे गारमेंट मध्ये येवुन माझेकडे पैसे मागणी करीत होते. त्यावेळी मी त्यांना पैशाची जुळणा झालेनंतर कळवितो असे सांगितले होते.

दि.02/10/2024 रोजी मला उमेश लिंगणुरकर यांचा पुन्हा फोन आला की तुमचे शिल्लक बिल मंजुर करणार असुन त्यासाठी तुम्हाला मला व सचिन कांबळे यांना 80000/- रुपये हे दयावे लागतील नाही तर शिल्लक बिल

मंजुर करणार नाही असे सांगितले त्यावेळी मी त्यांना एक दोन दिवसात जुळणा करून भेटतो असे सांगितले. उमेश लिंगणुरकर हे त्यांचेसाठी व सचिन कांबळे यांचेसाठी माझेकडे मागत असलेले 80,000/- रूपये हे लाच म्हणून मागत असल्याची माझी खात्री झाली आहे. परंतु उमेश लिंगणुरकर व सचिन कांबळे यांना मला लाच रक्कम देणेची ईच्छा नाही. यापुर्वी उमेश लिंगणुरकर व सचिन कांबळे यांचेशी माझे कोणतेही देवाण घेवाणीचे व्यवहार नाहीत. तसेच माझा आणि त्यांचा कोणताही वाद नाही. मी उमेश लिंगणुरकर व सचिन कांबळे यांना आज दिनांक 04/10/2024 रोजी भेटणेस जाणार असुन त्यांचेवर योग्य ती कारवाई व्हावी म्हणुन तक्रार सांगुन माझा तक्रारी अर्ज त्यांचेकडे दिला. मी दिले अर्जावर कारवाईसाठी पाटील मॅडम यांनी मा. अधीक्षक, भूमि अभिलेख कार्यालय कोल्हापूर कार्यालयाकडुन दोन षासकिय पंचांना बोलावुन घेतले होते. तसेच त्यांचे कार्यातयातील सापळा पथकासाठी अमंलदार बोलावुन घेतले त्यानंतर त्यांचेषी तसेच पंचांषी माझी ओळख करुन देवुन मला माझी तक्रारी पंचांना सांगणेस सांगितली. त्यानंतर मी दिलेल्या तक्रारी अर्जावर पाटील मॅडम तसेच दोन्ही पंचांनी सहया केल्या. त्यानंतर पाटील मॅडम यांनी पुढील कारवाई अॅन्टी करप्शन ब्युरोचे ऑफीसमधुन करण्याचे आहे असे सांगुन त्यांच्याकडील व्हाईस रेकॉर्डरची संपुर्ण माहिती आम्हांला देवुन महिला आर्थिक विकास महामंडळ,कोल्हापूर येथील उमेश लिंगणुरकर व सचिन कांबळे यांच्या लाच मागणीचे अनुषंगाने सर्वांना पडताळणी बाबत आवश्यक सुचना दिल्या. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर चालु करून तो माझ्याकडे देवुन मला व पंच नं.1 यांना उमेश लिंगणुरकर व सचिन कांबळे यांना भेटणेकरीता पाठविले. त्यावेळी मी व पंच नं.01 असे माझे मोटर सायकल क्रमांक एम.एच.09.डी डब्ल्यु. 4986 वरून महिला आर्थिक विकास महामंडळ,कोल्हापूर येथील कार्यालयात गेलो त्यावेळी मी कार्यालयात जावुन पाहीले असता उमेश लिंगणुरकर व सचिन कांबळे हे कार्यालयात नव्हते म्हणुन मी माहीती घेतली असता ते कलक्ेटर ऑफीसमध्ये गेले असल्याचे समजले. त्यानंतर मी माझे वरील मोबाईल नंबर वरून उमेश लिंगणुरकर यांचे मो.नं. 9860638416 वरती फोन केला त्यावेळी मी त्यांना त्यांचे ऑफीसमध्ये आल्याचे सांगितले त्यावेळी मी काय विषय म्हणजे आपला जे लक्ष्मी बचत गटाचं जे काम आपण केलयंनी पुर्ण त्यासाठी तुम्ही जे परसस्टेज सांगितलयं मला... असे म्हणालो. त्यावेळी लिंगणुरकर हा हा असे म्हणाले त्यावेळी मी तुम्ही जे परसस्टेज सांगितलाय त्या परसस्टेज जरा कमी जास्त करायसाठी बोलायचं होतं... असे म्हणालो. त्यावेळी लिंगणुरकर नाही होणार काय त्यातं... असे म्हणाले. त्यावेळी मी ऐंशी हजार सांगितलयं ना.. असे म्हणालो त्यावेळी लिंगणुरकर होय होय.. असे म्हणालो. त्यानंतर मी त्यांना पैसे कमी करणेबाबत सांगितले असता त्यांनी त्यास नकार देवुन ऐका की बाकीच्यासणी आपण एक वीस एक दहा असं सांगितलयं एक कमीत कमी  तुमचं हे सगळं बघुन तुम्हाला कमी रक्कम सांगितलयं महिती हाय... असे म्हणाले. त्यावेळी मी त्यांना सचिन सरांशी बोलन करून दया असे म्हणालो त्यावेळी लिंगणुरकर यांनी नाही ते भडकतील असे म्हणाले. त्यावेळी मी ते कसं व्हायला लागलयं लक्ष्मी बचत गटाचं काम तर पुर्ण केलयं ते राहिलेलं हे हाय पेमेंट जरास.. असे म्हणालो त्यावेळी लिंगणुरकर तु ते नंतर बघा काय कारयचं तुम्ही उदया हाय ते दया आणि विषय कट करून टाका... असे म्हणाले त्यावेळी मी ठिक हाय ठिक हाय... असे म्हणालो. त्यावेळी लिंगणुरकर ठिक हाय उदया साहेब किती वाजता फोन करणारा... असे म्हणाले त्यावेळी मी त्यांना आकरा सव्वा आकरा वाजता फोन करतो असे म्हणालो. त्यानंतर आमचेत उदया भेटणेबाबतचे बोलणे झाले त्यानंतर मी व पंच तेथुन निघुन ऑफीसमध्ये  येवुन पाटील मॅडम यांना सर्व हकीकत सांगितली.

त्यानंतर पाटील मॅडम यांनी सचिन कांबळे यांच्या लाच मागणीची पडताळणी करणे आवश्यक असलेने त्यांचे लाच मागणीची पडताळणी करणेचे अनुषंगाने पुन्हा सर्वांना आवश्यक सुचना दिल्या. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर चालु करून तो माझ्याकडे देवुन मला व पंच नं.1 यांना सचिन कांबळे यांना भेटणेकरीता कलेक्टर ऑफीस कोल्हापूर येथे पाठविले. त्यावेळी मी व पंच नं.01 असे वरील मोटार सायकलवरून कलेक्टर ऑफीस येथे गेलो. त्यावेळी सचिन कांबळे हे मला कलेक्टर ऑफीसच्या आवारात भेटले. त्यावेळी मी त्यांना उमेश सरांना मघाशी फोन केला होते असे म्हणाले त्यावेळी कांबळे हा बोला की काय...असे म्हणाले. त्यावेळी मी काय नाय सरांनी जी पारीत केलं त्यामध्ये जरा... असे म्हणालो. त्यावेळी हु त्यात काय होत नाही ते शिक्षण विभागाला दयायचं हाय वर त्यात काय होत नाही ते कमीचं सांगितलयं तुम्हाला उगचं त्यात हे करू नका तुम्हच्याकडं लय सहानभुती पुर्वक बघितलयं करा... असे म्हणाले. त्यावेळी मी त्यांना पैसे कमी करणेबाबत विनंती करत होतो त्यावेळी त्यांनी नाय नाय असे म्हणाले. त्यानंतर कांबळे काय नाय काय नाय तुमचा चेक काढस तोव्हर गोड बोललाय आमच्या बरोबर आता आल्या नंतर गुंण गुंण करायला आम्हाला अगोदर माहिती होतं तुम्ही... असे म्हणाले. त्यावेळी मी सचिन साहेब रिक्वेस्ट कराय लागलोय तुम्हाला... असे म्हणालो त्यावेळी कांबळे नाय सांगितलयं तुम्ही सांगितलयं तुम्हा हाय ते करा विषय मिटवा डोक्याला ताण नका आमच्या एकच काम हाय व्हय आम्हाला... असे म्हणाले. त्यावेळी मी ऐंशी सांगितल्यात ते पन्नास साठ बर करा... असे म्हणालो. त्यावेळी कांबळे नाय जमत नाही जमत नाही नाय नाय उगचं काय तरी हे बघा त्याला मी एक लाख वीस हजार सांगितल्यालं शिक्षण विभागवाल्याकडणं... असे म्हणाले. त्यावेळी

मी हु.. असे म्हणालो त्यावेळी कांबळे त्यावर तुम्ही हे करून आम्ही ऐंशीवर आणलयं आणि त्यातणं तुम्ही हे करायला लागलाय होत नाही म्हणून मी चेक काढत नव्हतो तुमचा मला माहित होतं तुम्ही नाटक करणारा... असे म्हणाले त्यावेळी मी ठिक हाय असे म्हणालो. त्यानंतर मी व पंच तेथुन निघुन ऑफीसमध्ये येवुन पाटील मॅडम यांना सर्व हकीकत सांगितली. मला उमेश लिंगणुरकर यांनी दिनांक 05/10/2024 रोजी सकाळी 11.00 वाजता पैसे घेवुन बोलाविले असल्याने चालु कारवाई पाटील मॅडम यांनी थांबवुन सर्वांना गोपनियता राखणेबाबत सुचना करून दिनांक 05/10/2024 रोजी सकाळी 10.00 वाजता ऑफीसला येण्यास सांगितले.

दिनांक 05/10/2024 रोजी सकाळी 10.00 वा चे सुमारास मी अॅन्टी करप्शन ब्युरो कोल्हापूर चे ऑफीसमध्ये आलो त्यावेळी तेथे पंच, सापळा पथक पाटील मॅडम हजर होत्या. त्यावेळी पाटील मॅडम यांनी पुढील सापळा कारवाई सुरू केली. त्यावेळी पाटील मॅडम यांनी लाच रक्कम बाबत मला विचारणा केली त्यावेळी मी त्यांना माझेकडे 30,000/- रूपये असलेबाबत सांगितले. परंतु उमेश लिंगणुरकर व सचिन कांबळे यांनी माझेकडे 80,000/- रूपयांची मागणी केली आहे त्यामुळे त्यांना 80,000/- रूपये दिले पाहीजेत असे मी पाटील मॅडम यांना सांगीतले. त्यानंतर 500/- रू असे लिहलेल्या चिल्डर्स बँक च्या लहान मुलाच्या खेळण्यातील 100 नोटा उपलब्ध केल्या. असे एकुण 80,000/- लाच रक्कम उपलब्ध झाली. त्यावेळी सापळा कारवाईचे अनुषंगाने सापळा पुर्व संपुर्ण कार्यवाही केलेनंतर अॅथ्रासिन लावलेले 80,000/- रूपये माझे पॅन्टचे डावे खिशात ठेवुन दिले त्यावेळी पाटील मॅडम यांचेसुचनेवरून मी उमेश लिंगणुरकर यांना फोन केला असता त्यावेळी मी त्यांना उमेश सर पैशाचे काम झालेल हाय... असे म्हणालो त्यावेळी लिंगणुरकर बर.. असे म्हणाले. त्यावेळी मी एक दहा पंधरा मिनीटात या गारमेंटला असे म्हणालो. त्यावेळी लिंगणुरकर बर बर ठिक हाय येतो येतो.. असे म्हणाले. त्यानंतर फोन बंद केला. सदरचा कॉल रेकॉर्ड केला. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर सुरू करून ते माझेकडे दिले त्यानंतर मी व पंच नं.1 असे अॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर येथुन शुक्रवार पेठ कोल्हापूर येथे असले माझे गारमेंटकडे चालत निघालो. त्यावेळी माझे पाठोपाठ पाटील मॅडम, सापळा पथक पंच नं.2 आले व माझे गारमेंन्टचे आजुबाजुला सापळा लावुन थांबले. मी गारमेंन्टमध्ये त्यांची वाट पाहत थांबलो होतो त्यावेळी उमेश यांचा मला फोन आला व त्यानी मला दसरा चौक येथल साधना कॅफे मध्ये या असे म्हणाले त्यावेळी मी त्यांना गारमेंन्ट मध्ये या येथे मोटारीला पाणी आलय असे सांगितले त्यावेळी त्यांनी मला 15 नंबर शाळेजवळ बोलविले त्यावेळी मी त्यांना ठिक आहे येतो शाळेपाशी असे म्हणालो. त्यानंतर मी व पंच 15 नंबर शाळेजवळ निघालो आमचे पाठोपाठ पाटील मॅडम, सापळा पथक पंच नं.2 आले व शाळेच्या परीसरात आजुबाजुला सापळा लावुन थांबले. काहीवेळात तेथे उमेश लिंगणुरक आले त्यांनी मला साधना हॉटेलमध्ये आला पाहीजे होता असे म्हणाले त्यावेळी मी त्यांना पाणी आलेले म्हणुन सांगितले. त्यावेळी लिंगणुरकर बर दया की तुमच्या बसलं किती हाईत हे ऐंशी...असे म्हणाले. त्यावेळी मी ऐंशी हजार... असे म्हणालो. त्यावेळी लिंगणुरकर नक्की काय... असे म्हणाले त्यावेळी मी ऐंशी हजार हाईत ... असे म्हणुन उमेश लिंगणुरकर व सचिन कांबळे यांनी माझेकडे मागणी केलेप्रमाणे 80,000/- रूपये उमेश लिंगणुरकर यांच्याकडे दिले. त्यांनी ते पैसे स्विकारून पैसे मोजु लागले त्यावेळी मी त्यांना सचिन कांबळे यांना फोन करा की असे म्हणालो. त्यावेळी लिंगणुरकर नक्कली हाईत काय अं... असे म्हणाले. त्यावेळी मी सचिन सरांना फोन लावा की लावा की सर...असे म्हणालो. त्यावेळी लिंगणुरकर लावतो ओ तेन्ही बाहेर आहेत साहेबां असे म्हणाले. त्यावेळी आमचेत कामगाराचे पैशाबाबत तसेच कांबळे सरांचेबाबत बोलणे झाले. त्यावेळी लंगणुरकरए बघा साहेब नक्कली नोट... असे म्हणाले. त्यावेळी मी आता गड्डा बँकेतणचं आलाय... असे म्हणालो. त्यावेळी लिंगणुरकर नाय नाय नक्कली नोटा आहेत साहेब साहेबा या सगळया नकली नोटा हाईत साहेबा सगळया नक्कली नोटा... असे म्हणाले. त्यावेळी मी नाही गड्डा आलाय तसा... असे म्हणालो. त्यावेळी लिंगणुरकर नाय नाय हे बघा चला हे असलं करायचं नाही साहेब ठेवा धरा असे म्हणाले त्यावेळी मी पुन्हा त्यांना साहेब अस अस डायरेक्ट आलयं सर बँकेतणं... असे म्हणुन मी लाच रक्कम स्विकारलेचा पुर्वनियोजित हात रूमालाने चेहरा पुसुन लाच रक्कम स्विकारलेबाबतचा इशारा केला. त्यानंतर लगेचच पाटील मॅडम आणि त्यांचा स्टाफ तेथे आला व त्यांनी लाच स्विकारलेल्या रक्कमेसह उमेश लिंगणुरकर यांना पकडले. सदर ठिकाणी लाचेच्या सापळयातील प्राथमिक तपासण्या केल्या त्यावेळी पाटील मॅडम यांनी त्यांचेकडील साळुंके साहेब व त्यांचे स्टाफकडील एक पथक सचिन कांबळे यांना ताब्यात घेणेसाठी पाठविले. त्यानंतर आम्ही सर्वजण अॅन्टी करप्श्रन ब्युरोचे ऑफीसमध्ये आलो त्यांचेसोबत मी आलो त्यावेळी मला सचिन कांबळे यांचा फोन आलेला होता मी त्यांना परत फोन केला त्यावेळी त्यांनी मला उमेश यांना भेटुन किती वेळ झाला ते माझा फोन उचलत नाहीत असे म्हणाले त्यावेळी मी त्यांना अर्धा पाऊण तास झाला भेटुन असे म्हणालो त्यावेळी मी त्याना मी तुम्ही बोलल्या प्रमाणे ऐंशी हजार त्यांना दिलेत मी.. असे म्हणालो त्यावेळी कांबळे यांनी ठिक आहे असे म्हणाले. सदर फोन रेकॉर्ड केला. त्यानंतर पुढील सर्व कार्यवाही ही अॅन्टी करप्शन ब्युरो, कार्यालय कोल्हापूर येथे पुर्ण करण्यात आली.

तरी लक्ष्मी स्वयंसहाय्यता महिला समुह, पिरवाडी ता.करवीर जि.कोल्हापूर या बचत गटास महिला आर्थीक

विकास महामंडळ, कोल्हापूर यांचेकडुन 19 केंद्र शाळांना गणवेश शिलाई करून पुरवठा करण्याचे काम मिळाले होते. सदरचे काम लक्ष्मी स्वयंसहाय्यता महिला समुह यांचेवतीने त्या बचत गटाच्या अध्यक्षा सौ.सोनाली प्रविण खोत यांनी मला करणेस दिलेले होते. तसेच काम पुर्ण झालेनंतर महिला आर्थीक विकास महामंडळ, कोल्हापूर येथे जावुन केले कामाचे बिल मिळणेबाबतचे काम त्यांचे वतीने करणेस सांगितले होते. त्याप्रमाणे मी काम पुर्ण करून दिले नंतर कामाचे बिलाबाबत महिला आर्थीक विकास महामंडळ, कोल्हापूर येथे पाठपुरावा करीत होतो. त्याप्रमाणे कामाचे एकुण बिलाचे रक्कमेपैकी 14,35,000/- रुपये बिल मला लक्ष्मी स्वयंसहाय्यता महिला समुह, पिरवाडी यांचे बँक खात्यामध्ये वेळोवेळी जमा झालेनंतर मला मिळालेली आहे. त्यानंतर मी शिल्लक बिलाची रक्कम मंजुर झाली नसल्याने महिला आर्थीक विकास महामंडळ, कोल्हापूर येथील उमेश लिंगणुरकर यांची भेट घेवून विचारले असता त्यांनी मला तुमचे 14,35,000/- चे बिल मंजुर केलेले आहे. बिल मंजुर केले म्हणुन तसेच शिल्लक राहीलेले बिल मंजुर करावयाचे असले तर तुम्हाला मला व सचिन कांबळे साहेब यांना मिळून 80,000/- रुपये लाचेची मागणी केली त्याप्रमाणे पडताळणी केली असता उमेश लिंगणुरकर व सचिन कांबळे यांनी माझेकडे अप्रामाणिकपणे 80,000/- लाचेची मागणी केली. त्यानंतर मागणी केलेली लाच रक्कम उमेश लिंगणुरकर यांनी त्यांचेकडे देणेस सांगितल्याने सापळा कारवाईमध्ये उमेश लिंगणुरकर यांनी  माझेकडे त्यांनी तसेच सचिन कांबळे यांनी मागणी केलेप्रमाणे त्यांनी माझ्याकडुन बेकायदेशीरपणे 80,000/- रूपये लाच रक्कम स्विकारताना त्यांना अॅन्टी करप्शन ब्युरो,कोल्हापूर कडील पथकाने त्यांना रंगेहाथ पकडल्याने माझी 1) सचिन सिताराम कांबळे, वय - 45 वर्षे, जिल्हा समन्वय अधिकारी, महिला आर्थीक विकास  महामंडळ जिल्हा परीषद समोर नागाळा पार्क,कोल्हापूर रा. महालक्ष्मी टेरेस अपार्टमेंन्ट ए - 402, दुसरा मजला देवकर पाणंद कोल्हापूर, मुळ रा.प्लॉट नं.39, पंडीतराव जाधव नगर राम मंदिरजवळ पाचगाव, ता. करवीर, जि.कोल्हापूर 2) उमेश बाळकृष्ण लिंगनुरकर वय -46 व्यवसाय - नोकरी, सहायक सहनियंत्रक अधिकारी महिला आर्थिक विकास महामंडळ जिल्हा परीषद समोर नागाळा पार्क,कोल्हापूर रा. 2875 सी वॉर्ड समाज मंदिर जवळ,सिध्दार्थ नगर कोल्हापूरयांचेविरूध्द माझी कायदेशीर फिर्याद आहे.

माझी वरील फिर्याद मी सांगितलेप्रमाणे संगणकावर मराठीत टंकलिखीत केली असुन ती मी स्वतः वाचुन पाहिली असता ती खरी व बरोबर आहे.

समक्ष

**13. Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (**केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.**)**

**(1) Registered the case and took up the investigation:**
**(**प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले**):**

**or (**किंवा**)**

**(2) Directed (Name of I.O.) (**तपास अधिका-याचे नाव**):**
Bhagavan Bandu Girigosavi
**Rank (**पद**):** Asst. SI (Assistant Sub-Inspector) **No.(**क्र.**):** PSMH25716
**to take up the Investigation (**ला तपास करण्याचे अधिकार दिले**) or (**किंवा**)**

**(3) Refused investigation due to (**ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला**):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

**(4) Transferred to P.S.**
**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**
**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

**15. Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**Signature of Officer in Charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** dilip shishupal pawa
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):**